साखर कारखाना ते नॉमिनीच्या गोदामापर्यंत नियंत्रित
साखरेची तसेच दारिद्रय रेषेवरील केशरी शिधापत्रिका
धारकांना वितरीत होणा-या साखरेची वाहतूक करण्यासाठी
वाहतूक कंत्राट निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
अन्न, नागरी पुरवठा व ग्रहक संरक्षण विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र.साखर-२५१०/प्र.क्र.७३/नापु-१९
मंत्रालय विस्तार, मुंबई-४००० ०३२.
दिनांक :- ५ एप्रिल, २०१३

वाचा:- १) शासन निर्णय, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक साखर-२५१०/प्र.क्र.७३/नापु-१९ दिनांक २ जून, २०१०.
२) शासन निर्णय, साखर-१७१०/प्र.क्र.१३७/ना.पु.१९, दिनांक २३ सप्टेंबर,२०१०
३)शासन शुध्दीपत्रक, क्रमांक-साखर-२५१०/प्र.क्र.७३/ना.पु.१९, दिनांक २३ फेब्रुवारी,२०१२
४) शासन निर्णय क्र.साखर-२५१३/प्र.क्र.४५/ना.पु.१९, दिनांक २६ मार्च,२०१३.

**-: शासन शुध्दीपत्रक :-**

शासन निर्णय दि.२ जून, २०१० अन्वये साखर कारखाना ते नॉमिनीच्या गोदामापर्यंत नियंत्रित साखरेची तसेच दारिद्रय रेषेवरील केशरी शिधापत्रिका धारकांना वितरीत होणा-या साखरेची वाहतूक करण्यासाठी वाहतूक कंत्राट निश्चित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदर निर्णयामध्ये परिच्छेद २.७ (अ) व (ब) अन्वये वाहतूक अंतराच्या परिगणना करणेबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या होत्या.

त्यानंतर सदर शासन निर्णयात संदर्भ क्र.३ अन्वये परिच्छेद २.७ मध्ये (क) येथील बाबींचा समावेश करण्यात आला होता.

आता सदरहू शासन निर्णयातील परिच्छेद २.७ (क) च्या पुढे पुढीलप्रमाणे समावेश करण्यात येत आहे.

(ड) सार्वजनिक बांधकाम विभाग/राज्य परिवहन महामंडळ यांचेकडून सतत पाठपुरावा करुनही दोन महिन्यात वाहतूक अंतरे प्रमाणित करुन न मिळाल्यास जिल्हा अधिकारी यांनी इंटरनेटद्वारे “maps. Google.co.in” या संकेतस्थळावरुन वाहतूकीसाठी करुन देण्यात येणा-या नजिकच्या मार्गाची अंतरे प्राप्त करावी किंवा साखर वाहतूकीच्या वाहनाबरोबर जिल्हापुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील जबाबदार व्यक्तिस नियुक्त करुन अंतरे प्राप्त करुन घ्यावीत. जिल्हाधिकारी यांनी अशाप्रकारे प्रमाणित केलेल्या अंतराच्या आधारे वाहतूक खर्च अदा करावा.

हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१३०४०६१४५८५७७४०६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ए.का.गागरे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
मुख्य सचिव
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग.
अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी/ सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी.
सर्व उप आयुक्त (पुरवठा).
संचालक नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा) पुरवठा भवन, परेल, मुंबई.
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-४), मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (ना.पु.-१९).